# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**
**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१.**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट १३-२३** **दिनांक १२/०१/२०२३**

## ओमान देशात घरकामाकरिता नेवून डांबुन ठेवलेल्या भारतीय महिलेस ०५ दिवसांत भारतात सुखरूप आणण्यात विशेष शाखेला यश.

दिनांक ०४/०१/२०२२ रोजी वसई पोलीस ठाणे येथे तक्रारदार नामे श्रीमती. कमलावती पारस वर्मा, वय ५० वर्षे, धंदा- गृहिणी, रा. साईदत्त नगर, वसई कोळीवाडा, वसई पश्चिम, ता. वसई, जि. पालघर यांनी तक्रारी अर्जाद्वारे कळविले की, त्यांची मुलगी नामे श्रीमती. अंजु पारस वर्मा, वय ३० वर्षे, ही दिनांक २५/०८/२०२२ रोजी मस्कत, ओमान या देशामध्ये नोकरीकरिता गेली होती. परंतु सध्या तिला तेथे नोकरी करताना त्रास होत असुन तीला तेथे नोकरी करायची नाही व तीला परत भारतात यायाचे आहे, परंतु तीचा पासपोर्ट व व्हिसा ओमान देशातील एजंट प्रसन्ना याच्याकडे जमा असुन तो तिला व्हिसा व पासपोर्ट देण्यास नकार देत असुन ती तीन दिवसांपासुन मस्कत, ओमान एअरपोर्ट येथे थांबली आहे.

सदरचा अर्ज वसई पोलीस ठाणे यांचेकडुन विशेष शाखा, पारपत्र विभाग यांना प्राप्त होताच पारपत्र विभागाचे अधिकारी व अंमलदार यांनी तात्काळ वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली ओमान, मस्कत येथे अडकलेली भारतीय महिला नामे श्रीमती अंजु पारस वर्मा, वय ३० वर्षे, हिचेशी संपर्क केला असता समजले की, एजंट प्रसन्ना याने अंजुचा व्हिसा ०२ वर्षाकरिता वाढविला असुन त्यासाठी त्याचे पैसे खर्च झाल्याने तो तिला पासपोर्ट व व्हिसा देत नाही. त्यानंतर **Embassy of India, Muscat , Oman** यांना इमेल करुन पिडीत अंजु वर्मा हीस मदत करण्याची विनंती केली व वरील सर्व प्रकार त्यांना सांगितला. त्यानंतर त्यांनी मदत करण्याची व तिला आश्रय देण्याची विंनती मान्य केल्याने अंजु वर्मा हीस **Embassy of India, Muscat , Oman** येथे पोहोचण्यास सांगितले. त्यानुसार **Embassy** चे अधिका-यांनी तिच्या व्हिसा स्पॉन्सरशी संपर्क करुन सर्व कायदेशिर बाबी पुर्ण करुन तिकडील कायदयाप्रमाणे लेबर कोर्टात व्हिसा रदद केला व दिनांक ०९/०१/२०२३ रोजी अंजु वर्मा ही सुखरुप भारतात पोहचीली असुन तिचे कुटुंबियांचे ताब्यात दिलेले आहे. तक्रारदार यांची मुलगी सुखरुप भारतात परत आल्याने तक्रारदार महिला यांनी पोलीसांचे आभार मानून समाधान व्यक्त केले आहे.

सदरची कामगिरी श्री. प्रकाश गायकवाड, पोलीस उपआयुक्त (मुख्यालय), श्री. विनायक नरळे, सहायक पोलीस आयुक्त (वि.शा) यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि. कुमारगौरव धादवड, प्रभारी अधिकारी विशेष शाखा, म.सपोनि संजीवनी सोलनकर, म.पो.ह. मंजुषा गुप्ता व म.पो.शि.सिमा दाते यांनी पार पाडली आहे.